**पोलीस अधीक्षक कार्यालय,जळगाव**
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in

जनसंपर्क अधिकारी
दि.०२/०३/२०२६.

**विषय :- लिफ्ट देण्याच्या बहाण्याने कार मध्ये बसवून जबरी चोरी करणारा आरोपी स्थानिक गुन्हे शाखेने कारसह घेतला ताब्यात.**

| पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम | रिपोर्ट देणारे |
|---|---|---|
| एमआयडीसी पो.स्टे. | 153/2026, भा.न्या.सं.क. 309 (4), 3 (5) प्रमाणे. | पो.उप.निरी.शरद बागल, स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव. |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **गुन्हा दाखल तारीख व वेळ** | **गुन्हा उघड तारीख** |
| गोपनीय | दि.01.03.2026 रोजी 18.50 वा. | दि.01/03/2026 |

**गुन्हे उघडकीस आणणारे पोलीस अधिकारी व अंमलदार.**

**मा.श्री.महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगांव.**
**मा.श्री.अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक,जळगांव परिमंडळ.**
**मा.श्री.नितीन गणापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी,जळगांव उपविभाग, जळगांव.**
**यांचे मार्गदर्शनाखाली**
**श्री.राहुल गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा,जळगांव,**
**पोलीस उप निरीक्षक शरद बागल, सहा.फौज.अतुल वंजारी, पो.हे.कॉ.विजय पाटील, अक्रम शेख, नितीन बाविस्कर, पो.ना.अ.किशोर पाटील आणि पो.अ.रवींद्र कापडणे, राहुल रगडे, छगन तायडे, प्रदिप चवरे.**

| | |
|---|---|
| **आरोपीचे नांव व पत्ता :-** | शंभू उर्फ पप्पू सुभाष पाटील रा.केदार नगर पिंप्राळा ता.जि.जळगांव. |
| **आरोपी अभिलेख :-** | निरंक |
| **जप्त मुद्देमाल :-** | 4,00,000/- रू किंमतीची स्विफ्ट डिझायर कार क्रमांक MH-43-AB-9210 गुन्ह्यात वापरलेली जु.वा |

**-: गुन्हयाची थोडक्यात हकिगत :-**

दिनांक २८.०२.२०२६ रोजी सायंकाळी ०५.१५ वाजेच्या सुमारास सलमान खान अमान उल्ला खान रा.निंभोरा ता.रावेर असे अजिंठा चौफुलीजवळ निंभोरा येथे जाणेकामी उभे असतांना अज्ञात ४ इसमांनी कारमध्ये येवून त्यांना १०० रू भाडे लागतील असे बोलून रावेरला सोडतो असे सांगून कारमध्ये बसवून कार चालकाने व त्याच्या शेजारी बसलेल्या इसमाने थोड्याच अंतरावर फिर्यादीच्या कंबरेस चाकू लावून व मागे शिटावर बसलेल्या इसमांनी फिर्यादीचे दोन्ही हात पकडून फिर्यादी यांच्या डाव्या खिश्यातील ९७००/- रूपये जबरीने काढून घेतले होते. म्हणुन सदर बाबतीत सलमान खान यांनी एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने अज्ञात कारमधील अज्ञात ४ इसमांविरूध्द 153/2026, भा.न्या.सं.क. 309 (4), 3 (5) प्रमाणे एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**-: पोलीस कारवाई आणि तपास:-**

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता, पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.राहुल गायकवाड यांना मिळालेल्या गोपनिय बातमीनुसार सदर गुन्ह्यात वापरलेले कारचा नंबर निष्पन्न करून सदर कारवरील चालक शंभू उर्फ पप्पू सुभाष पाटील रा.केदार नगर पिंप्राळा ता.जि.जळगांव यांस ताब्यात घेवून एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिले आहे. तसेच त्याच्या सोबत असलेल्या इतर साथीदारांचे नाव निष्पन्न करण्यात आलेले असून ते रेकार्डवरील गुन्हेगार आहेत. तसेच त्यांचा शोध सुरू आहे.

एमआयडीसी पो.स्टे.कडिल गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मोहम्मद अली सैय्यद हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव.

